पुस्तकाचे नाव - वेदोक्तधर्मप्रकाश

लेखकाचे नाव - विष्णूबोवा ब्रम्हचारी

प्रकाशक - गणपत कृष्णाजी, मुंबई

प्रकाशन वर्ष - १८५९

किंमत - उपलब्ध नाही

पृष्ठसंख्या - ७९०

सारांश -

पुस्तकाच्या नावात आहे त्याप्रमाणे वेदातील धर्म संकल्पनांवर या पुस्तकात प्रकाश टाकलेला आहे. प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे पुस्तकात खालील विषयांवर प्रकरणे आहेत - वेदोक्तधर्माचा विचार, आज्ञा वेदोक्त धर्माच्या, न्याय, निराकार देवाविषयी, नीहतीपर पुराणोक्त गोष्टी, वेदातील सृष्टीचे नियम व त्यांची प्रमाणे, श्रीकृष्णाच्या कथा, वेदोक्त धर्माचा थोरपणा, ज्योतिषशास्त्रांतील नावे व सिद्धांत, धर्मासंबधी स्पष्टीकरण, वेदोक्तधर्माची मार्मिक प्रश्नोत्तरे, हटयोग व राजयोग, राजनीती, विचारदर्शन, म्लेंछंते, मंत्रशास्त्र, सत्याचा वाद, नास्तिकाला जिंकण्याचे वाद इत्यादी. त्यानंतर ग्रंथसमाप्तीची सूचना आहे व पुढे भावार्थसिंधू ग्रंथातील योगमार्गप्रदर्शन, पंचकोशांचे विवरण, भक्तिमार्ग मुक्तलक्षणे व जनास उपदेश या विषयांवर ओव्या आहेत.

शीर्षकपानाची प्रतिकृती -



# वेदोक्त धर्मप्रकाश.

## प्रस्तावना.

हें पुस्तक, वेदप्रतिपाद्य धर्म आबालवृद्धांस कळावा, व शाळांतून मुलांना शिकवावा, या हेतूने विष्णूबावा ब्रह्मचारी याणी केलें. याची पद्धत प्रश्न करावा आणि उत्तर द्यावें अशी आहे. व कर्म काय, व उपासना काय, व ज्ञान काय, हें यांत दाखविलें आहे. तशीच नीती दाखविली आहे. व वेदोक्त धर्मसंबंधीं अर्थसहित शब्द माहीत व्हावे ह्मणून प्रश्नोत्तराने दाखविले आहेत. व हे शब्द पाठ असल्याने व त्या शब्दांचा अर्थ माहीत असल्याने वैदिक धर्माचे हरएक पुस्तकांत अर्थ सांगितला आहे तो वाचून ध्यानांत राहील, व प्रसंगीं स्मृति होईल, ह्मणून सर्वांनी हे शब्द अर्थसहित पाठ करावे. व जसे व्याकरणाचे शब्द शाळेंत मुलांकडून पाठ करवितात, तसे ह्या वेदोक्त धर्मप्रकाशांतील शब्द पाठ करवावे, ह्मणजे सर्व लोक वैदिकधर्मज्ञ होतील, आणि त्यांची विच्यार शक्ति वाढेल, व त्यांना शांती राहील, व त्यांच्यांत पापभीति राहील, व ते ज्ञानयुक्त परमेश्वराचे भक्त होतील.

५७८९
क ३०|३९